नि.दि.दावा. क्र. २४/२०१२.
मारुती व इतर वि. रेखा व इतर.
MHKO150000772009.

## निशाणी क्रमांक १५६ वरील आदेश.

**१.** मयत वादी क्र.१ च्या वारसांनी प्रस्तूतचा अर्ज त्यांना सदर दाव्यात मयत वादी क्र.१ चे वारस म्हणून पटलावरती घेण्यासाठी दाखल केला आहे. अर्जदारांचे थोडक्यात कथन की, वादी क्र.१ चे दि. १५.११.२०२४ रोजी निधन झालेले असून ते त्याचे सरळ वारस असून प्रस्तूत दावा पुढे चालविण्याचा त्यांना अधिकार आहे. सबब, त्यांनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

**२.** प्रतिवादींतर्फे योग्य ते आदेश होण्याची विनंती करण्यात आलेली असून त्यांनी वादी क्र.१ हा दि. १५.११.२०२४ रोजी मयत झाल्याचे तसेच अर्जदार त्याचे सरळ वारस असल्याची बाब नाकारलेली नाही.

**३.** वादी व प्रतिवादींच्या वकिलांचा विस्तृत युक्तिवाद ऐकला. वादींच्या वकिलांनी प्रस्तूत दावा हा हक्कज्ञापनाचा असून वादी क्र.१ च्या वारसांना दावा चालविण्याचा अधिकार असल्यामुळे अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे. प्रतिवादींच्या वकिलांनी योग्य ते आदेश करण्याची विनंती केलेली आहे.

**४.** अर्जदारांनी मूळ अर्जासोबत मयत वादी क्र.१ च्या मृत्यूपत्राची प्रत सादर केलेली आहे. प्रतिवादींनी देखील सदर बाब विवादीत केलेली नाही. मुदतीच्या कायद्याच्या परिच्छेद १२० व १२१ मधील तरतूदीप्रमाणे अर्ज मुदतीत सादर करण्यात आलेला आहे. दाव्यातील मागणीचे स्वरुप पाहता, मयत वादी क्र.१ च्या कायदेशीर वारसांना पटलावरती आणणे गरजेचे आहे. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या बाबींचा विचार करता खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे,

## आदेश

**१.** अर्ज खालील प्रमाणे मंजूर करण्यात येतो.

२. वादींनी नियमा प्रमाणे दुरुस्ती करुन अर्जदारांना मयत वादी क्र.१ चे वारस म्हणून दाव्यात समाविष्ट करुन घेऊन सुधारीत प्रती दाखल कराव्यात.

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

**(आर. पी. थोरे)**

जे. ओ. कोड–एम.एच.०२८९७

दिनांक – २५.०२.२०२५. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते